# <u>शुध्दीपत्रक</u>

**तलाठी जाहिरात:-**

साप्रवि शासन निर्णय दि.१० जुलै २००८ मधील तरतुदीनुसार भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ खालील परंतुका अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार तयार करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या प्रारुपामध्ये महाराष्ट्र राज्यात किमान वास्तव्याची अट अंतर्भूत करण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन देण्यात येणाऱ्य जाहिरातीमध्येही अशा प्रकरची अट विहित केलली नसते. त्यामुळे महाराष्ट्र –कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना संबंधित पदांच्या सेवा भरती नियमातील सर्व अटीची पुर्तता ते करीत असल्यास, त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व त्यांची गुणानुक्रमे निवड होत असल्यास महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नेमणूकीस ते पात्र राहतील. सदर उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये महाराष्ट्रात सतत १५ वर्षे वास्तव्याची अट विहित करण्यात आली असेल त्या पदांसाठी अर्ज करतांना त्यांचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य आहे किंवा नाही या अटींची छाननी करतांना त्यांचे सदर ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य विचारात घेण्यात यावे. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

वरील तरतुदींनुसार तलाठी पदभरती-२०१९ च्या जाहिरातीमध्ये महाराष्ट्र –कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांकडून अटींच्या पूर्ततेच्या अधिन अर्ज मागवण्यात येत आहेत.

(डॉ. संतोष भोगले)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

क्र.तलाठी-२०१७/प्र.क्र.४६१/ई-१०

दिनांक:- ०५ मार्च, २०१९.